# मराठी भाषा अभ्यास मंडळ
## (शैक्षणिक वर्ष: २०२२-२३)

बैठक क्रमांक - ४
विभाग : मराठी
दिवस : मंगळवार
तारीख : २८ मार्च २०२३
वेळ : दुपारी १२.३० वाजता
ठिकाण : आभासी मंच - "गूगल मीट"

**सभेचे इतिवृत्त**

मुद्दा क्र. ४.०१ : मराठी भाषा आणि साहित्य विभागाच्या अभ्यास मंडळाची सभा मंगळवार दिनांक २८ मार्च २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता गूगल मीट वर आभासी मंचाद्वारे (ऑनलाईन) मराठी भाषा विभागप्रमुख प्रा.डॉ.संतोष लक्ष्मण राणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.प्रा.डॉ.संतोष राणे यांनी सभेचे प्रास्ताविक केले. सभेला अभ्यास मंडळाचे खालील सर्व सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| डॉ.नितीन आरेकर | मा.कुलगुरू मुंबई विद्यापीठ,नामनिर्देशित सदस्य. सहयोगी प्राध्यापक.सीएचएम महाविद्यालय,उल्हासनगर |
| डॉ.राजेंद्र सांगळे | (बाह्य विद्यापीठ सदस्य,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) |
| श्री.देवेंद्र भुजबळ | माजी संचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन |
| कु.काजल थळे | गुणवंत माजी विद्यार्थिनी. |
| प्रा.संतोष लक्ष्मण राणे | अध्यक्ष - मराठी भाषा अभ्यास मंडळ, विभागप्रमुख-मराठी भाषा आणि साहित्य |
| प्रा.रुपेश यशवंत महाडीक | सदस्य मराठी विभाग |
| प्रा.राजश्री माने-जाधव | सदस्या,मराठी विभाग |

मुद्दा क्र.४.०२: प्रा.रुपेश महाडीक यांनी सभा क्र.३ चा इतिवृत्तांत वाचला.पूर्वसभेत मान्यवर सदस्यांकडून कोणत्याही बदलाच्या सूचना नसल्याने शैक्षणिक अभ्यासक्रम बदलाबाबत चर्चा करण्यास अनुमोदन घेण्यात आले.

Scanned with CamScanner

मुद्दा क्र. ४.०३ प्रा.रुपेश महाडीक यांनी सध्याच्या तृतीय वर्ष कला शाखेच्या मराठी भाषा विषयाच्या अभ्यासपत्रिका क्रमांक ४,५,६,७,८,९ यांच्या सत्र ५ आणि सत्र ६ यांचा अभ्यासक्रम आणि बदल करून प्रस्तावित अभ्यासक्रम पीपीटी सादरीकरणाच्या माध्यमातून सर्वांना दाखविण्यात आला.प्रस्तावित अभ्यासक्रमाची सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी सन्माननीय तज्ञ प्राध्यापकांनी.त्या अनुषंगाने अभ्यासक्रमात बदल करून सदरच्या अभ्यासक्रमाला अभ्यासमंडळाकडून मान्यता देण्यात आली.

मुद्दा क्र. ४.०४ : अभ्यासमंडळास COs बद्दल माहिती देण्यात आली.त्यात मराठी विषय अनुषंगाने कोणताही बदल सदस्यांकडून करण्यात आला नाही.

मुद्दा क्र. ४.०५ : अभ्यासमंडळासमोर प्रा.रुपेश महाडीक यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून महाविद्यालयात मराठी विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम M.A.मराठी सुरु करण्याबाबतची माहिती देऊन तसा प्रस्ताव सादर करण्यात आला. अभ्यास मंडळ सदस्यांनी त्यावर चर्चा करून M.A.मराठी अभ्यासक्रम संमत करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. सर्वच सदस्यांनी त्याला अनुमोदन दिले.

मुद्दा क्र.४.०६: प्रा.डॉ.संतोष राणे यांनी अभ्यास मंडळातील सदस्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण(NEP) - २०२० अनुषंगाने होणारे बदल येत्या शैक्षणिक वर्षात राबवले जाण्याबाबतची माहिती दिली.

मुद्दा क्र.४.०६: प्रा.राजश्री माने-जाधव यांनी जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाचे विश्वस्त मंडळ,महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ.महेश पाटील,ग्रंथालय प्रमुख प्रा.नारायण बारसे या सर्वांचे त्यांच्या मार्गदर्शनासाठी व सहकार्यासाठी मनःपूर्वक आभार मानले. तसेच अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांचेही आभार मानले. अभ्यास मंडळाची सभा १ वाजून ३० मिनिटांनी संपन्न झाली.

प्रा.डॉ.संतोष लक्ष्मण राणे
अध्यक्ष - मराठी भाषा अभ्यास मंडळ,

प्राचार्या
डॉ. सुचित्रा नाईक

Scanned with CamScanner